विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना
इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या परीक्षेमध्ये
सोयी-सवलती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१५/(११९-अ)/एस.डी.६**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०८ जानेवारी, २०१६

**संदर्भ** : १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : संकीर्ण २०२१/(१५/०१)/प्राशि ५, दिनांक १३/११/२००१.
२) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण १०२१/(१५/०१)/प्राशि ५, दिनांक २३/०६/२००३.
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : एसएससी १०१९/(१५१/९९)/ उमाशि २, दिनांक २८/११/२०००.
४) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र.संप्रप२००६/(२३१/०६)/प्राशि-५ दिनांक ०७ सप्टेंबर, २००६.

**प्रस्तावना :**

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिकार अधिनियम, २००९ व भारतीय संविधान कलम ४५ नुसार शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क आहे. वय वर्ष ६ ते १४ वर्षाच्या प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे शिक्षणविषयक सुविधा देणे आवश्यक आहे. विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांचे अध्ययन, अध्यापन पद्धती व मूल्यमापनाची तंत्रे हे देखील वेगळी असणे आवश्यक आहे. विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) म्हणजे अंशत: अंध /पूर्णत: अंध , मतिमंद, कर्णबधिर, अस्थिव्यंग, बहुविकलांग, स्वमग्न, सेरेब्रल पाल्सी, अध्ययनअक्षम अशा सर्व विद्यार्थ्यांना सामान्य शाळेत शिक्षण देताना सर्वच गोष्टींचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. म्हणून या विद्यार्थ्यांचे इतर सामान्य विद्यार्थ्यांच्या बरोबरीने प्रत्येक घटकामध्ये मूल्यमापन होऊ शकत नाही, म्हणून त्यांच्या ज्ञानाच्या, भाषेच्या मूल्यमापनाच्या पद्धती सामान्य मुलांपेक्षा वेगळया असणे अपेक्षित आहे.

संदर्भिय शासन निर्णयाद्वारे विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी सर्वसाधारण विद्यार्थ्यांना असलेल्या परीक्षा योजनेपेक्षा परीक्षा पद्धतीमध्ये काही सोयी-सवलती देणे आवश्यक आहे. या विद्यार्थ्यांना नवनवीन अभ्यास क्षेत्राची ओळख होणे, बुद्धि कौशल्य, हस्त कौशल्य, उद्यम शिलता या सर्व बाबींचा म्हणजेच सर्वंकष विकास होणे आवश्यक आहे. याकरीता या विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व सामान्य शाळेत सामान्य मुलांबरोबर शिक्षण घेता यावे याकरीता प्राथमिक स्तरावर इयत्ता १ ली ते ८ वी करीता सर्व शिक्षा अभियान - अपंग (दिव्यांग) समावेशित शिक्षण (IED - Inclusive Education for Disabled) व ९वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरीता राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान - अपंग (दिव्यांग) समावेशित शिक्षण माध्यमिक स्तर (IEDSS - Inclusive Education for Disabled at Secondary Stage) सुरु करण्यात आलेले आहे. या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन व परीक्षा पद्धती सर्वसामान्य विद्यार्थ्यांपेक्षा वेगळी असणे आवश्यक आहे. यासाठी विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांचे मूल्यमापन व परीक्षा पद्धतीमध्ये काही सोयी-सवलती देऊन त्यांना सामान्य विद्यार्थ्यांच्या पातळीपर्यंत आणणे हा सोयी-सवलती देण्यामागील मुख्य उद्देश आहे.

विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना शैक्षणिक मुल्यमापनामध्ये गरजेनुसार सोयी–सवलती देण्यासंदर्भात शासन स्तरावरुन समिती गठित करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीनुसार इ. १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सोयी-सवलती देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालील निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:**

इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे इतर सामान्य विद्यार्थ्यांच्या बरोबरीने प्रत्येक घटकामध्ये मूल्यमापन होऊ शकत नाही, म्हणून त्यांच्या ज्ञानाच्या, भाषेच्या मूल्यमापनाच्या पद्धती सामान्य मुलांपेक्षा वेगळया असणे अपेक्षित आहे. त्यानुसार खालील नमूद केल्याप्रमाणे प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावर (इ. १ ली ते ८ वी) पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीमध्ये आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील (इ. ९ वी ते १२ वी) पर्यंतच्या परीक्षा पद्धतीमध्ये सोयी-सवलती देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) इयत्ता १ ली ते १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी** खाली नमूद **केलेल्या** सवलतींचा **गरजेनुसार लाभ देण्यात यावा.**

**१) अंशत: अंध / पूर्णत: अंध विद्यार्थ्यांकरीता सवलती**

- अंशत: अंध / पूर्णत: अंध विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार जवळचे परीक्षा केंद्र सोयीचे राहील. (विद्यार्थी ज्या शाळेत शिक्षण घेत आहेत ती शाळा किंवा घराजवळची शाळा)
- या विद्यार्थ्यांना परीक्षेचा पेपर सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ देय राहील.
- अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना कमाल २० गुणांची सवलत एकाच विषयामध्ये किंवा सर्व विषयांमध्ये विभागून देण्यात यावी.
- परीक्षेसाठी शाळेच्या मान्यतेने व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पूर्व परवानगीने विद्यार्थ्यांना लेखनिक घेता येईल, तथापि, लेखनिकांची व्यवस्था करण्याकरिता पालकांना शाळेने सहकार्य करावे व लेखनिकांची यादी तयार ठेवावी.
- आकृत्या, नकाशे इ. काढण्याची सवलतदेय राहील, त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला त्या प्रमाणात देण्यात येतील.
- विज्ञान व तंत्रज्ञान (पेपर १ व २) या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी या विद्यार्थ्यांना या विषयाची तोंडी परीक्षा देता येईल.तोंडी परीक्षेत प्रात्यक्षिकांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.
- परीक्षा कालावधीमध्ये गणितीय पाटीचा (Trailor Frame) वापर करता येईल.
- परीक्षा कालावधीत आवाजाचा गणकयंत्राचा (Talking Calculator) वापर करता येईल.
- अंशत: अंध विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी स्केचपेनचा व प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी ग्लास मॅग्नीफायरचा वापर करता येईल.
- परीक्षेच्या वेळी गरजेनुसार ॲबॅकस व भूमितीय साहित्य साधनाचा वापर करता येईल.
- जर एखादया विद्यार्थ्याला संगणकाच्या द्वारे परीक्षा दयावयाची असल्यास स्क्रीन रिडींग सॉफ्टवेअर असलेला संगणक- NVDA Software चा वापर करता येईल. परंतु त्यासाठी विभागीय मंडळाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. (शाळेने याबाबतचा पत्रव्यवहार करणे आवश्यक आहे)
- विदयार्थ्यांना टेपरेकॉर्डरद्वारे प्रश्न देण्यात यावेत आणि त्यांनी प्रश्नांना दिलेली उत्तरे टेपरेकॉर्डवर रेकॉर्ड करण्यात यावेत, व त्यांच्या बसण्याची स्वतंत्र व्यवस्था असावी.

- ज्या वेळी दृष्टीहीन मुलगा बऱ्याच वेळेपासून ब्रेलमध्ये लिहित असेल आणि ज्यामुळे त्याला थकवा जाणवत असेल अशा वेळी काही वेळ त्यास विश्रांती देण्यात यावी. हा वेळ सवलतीच्या वेळेपेक्षा जास्त नसावा.
- ज्यावेळी ब्रेलवाचन, लेखनचाचणी असेल अशा वेळी ब्रेललिपीतील चुकांबाबत गुण कमी करु नयेत.तसेच गरज असेल अशा वेळी मौखिक पध्दतीने प्रश्नांची उत्तरे विचारुन त्याला कितपत ज्ञान आहे याबद्दल चाचणी घेण्यात यावी.
- चित्र/आकृत्या/नकाशे ऐवजी पर्यायी प्रश्न देण्यात यावेत.
- वस्तुनिष्ठ प्रश्नांसाठी सुस्पष्ट सूचना देण्यात याव्यात.
- ज्यावेळेस निबंधात्मक प्रश्न असतात आणि ते प्रश्न ब्रेलमध्ये लिहितात अशावेळी सदर प्रश्नावर गुणदान करतांना उत्तरे मोठ्या प्रमाणात लिहिलेले आहे हे न पाहता मुख्य मुद्यांवर (KeyPoints) वर लक्ष देण्यात यावे. शाळेने याविषयीचा पत्रव्यवहार करणे अत्यावश्यक आहे.
- जे विद्यार्थी आरोग्य व शारीरिक शिक्षण, समाजसेवा,बालवीर /वीरबाला/ छात्रसेना (N.C.C.) संरक्षण अभ्यास (Defence Studies) / मुलकी संरक्षण व रस्ता सुरक्षा गस्त (Civil Defence and Road Safety Patrol) इत्यादी विषय पूर्ण करुन शकत नाहीत, अशा विद्यार्थ्यांना या विषयात सवलत मिळविण्यासाठीचा अर्ज अपंगत्व (दिव्यांगत्व) प्रमाणपत्रासह संबंधित शाळेमार्फत विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे पाठवावा.

२) **कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी सवलती :**

- विद्यार्थ्यांना त्यांच्या सोईनुसार जवळचे परीक्षा केंद्र देय राहील.(विद्यार्थी ज्या शाळेत शिक्षण घेत आहेत ती शाळा किंवा घराजवळची शाळा)
- परीक्षा पेपर सोडविण्यासाठी प्रति तास ३० मिनिटे अधिक वेळ दिला जावा.
- अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना कमाल २० गुणांची सवलत एकाच विषयामध्ये किंवा सर्व विषयांमध्ये विभागून देण्यात यावी.
- प्रश्नाचे उत्तर अपेक्षित शब्दमर्यादेपेक्षा कमी शब्द मर्यादेत लिहिता येतील, दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे मुद्यांमध्ये उत्तर लिहिता येतील.
- मुलांच्या गरजेप्रमाणे त्यांना अनुकूल असणारे फेरबदल प्रश्नपत्रिकेत करण्यात यावेत.(फक्त इयत्ता १ ली ते ९ वी साठी).
- यामुलांसाठी स्पेलींग, व्याकरण, विराम चिन्हे चुकांबाबत गुणदान कमी करण्यात येवू नये.
- गणितीय शब्द रचना सरळ व सोपी असावी.
- मौखिक मुल्य मापनासाठी लेखीचा पर्याय असावा.
- परीक्षेसाठी सर्व मौखिक मार्गदर्शक सूचना फलकांवर लिहून देण्यात याव्यात.

३) **अस्थिव्यंग विद्यार्थ्यांसाठी सवलती**

- विद्यार्थ्यांना त्यांच्या सोईनुसार जवळचे परीक्षाकेंद्र देय राहील.(विद्यार्थी ज्या शाळेत शिक्षण घेत आहेत ती शाळा किंवा घराजवळची शाळा)
- परीक्षा पेपर सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ दिला जावा.
- अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना कमाल २० गुणांची सवलत एकाच विषयामध्ये किंवा सर्व विषयांमध्ये विभागून देण्यात यावी.

- विद्यार्थी ज्या हाताने लेखन करणार त्या हातात दोष असल्यास या विद्यार्थ्यांना लेखनिक घेता येईल. लेखनिकाची व्यवस्था संबंधित विद्यार्थ्याला शाळेची मान्यता घेवून करावी लागेल शाळांनी लेखनिकांची व्यवस्था करण्याकरिता सहकार्य करावे व यादी तयार ठेवावी.लेखनिक घेणाऱ्या व हातात दोष असणाऱ्या या विद्यार्थ्यांनाच परीक्षेचा पेपर सोडवण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ देण्यात येईल.
- जे विद्यार्थी आरोग्य व शारीरिक शिक्षण किंवा समाजसेवा बालवीर /वीरबाला/ छात्रसेना (N.C.C.) संरक्षण अभ्यास (Defence Studies)/ मुलकी संरक्षण व रस्ता सुरक्षा गस्त (Civil Defence and Road Safety Patrol) इत्यादी विषय पूर्ण करुन शकत नाहीत, अशा विद्यार्थ्यांना या विषयात सवलत मिळविण्यासाठीचा अर्ज अपंगत्व (दिव्यांगत्व) प्रमाणपत्रासह संबंधित शाळेमार्फत विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे पाठवावा.
- ज्याठिकाणी परीक्षा किंवा मुल्यमापन घेण्यात येईल त्याठिकाणी सहाय्यभूत भौतिक सुविधा मुलांच्या गरजे प्रमाणे उपलब्ध आहेत किंवा नाही याची खातरजमा **शाळेने करुन घ्यावी व त्याप्रमाणे** शाळांनी गरजे नुसार **सुविधा प्रदान कराव्यात.**

**४) बहुविकलांग (Spastic) विद्यार्थ्यांसाठी सवलती**

- विद्यार्थ्यांना त्यांच्या सोईनुसार जवळचे परीक्षाकेंद्र देय राहील. (विद्यार्थी ज्या शाळेत शिक्षण घेत आहेत ती शाळा किंवा घराजवळची शाळा)
- परीक्षा पेपर सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ दिला जावा.
- अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना कमाल २० गुणांची सवलत एकाच विषयामध्ये किंवा सर्व विषयांमध्ये विभागून देण्यात यावी.
- ज्या शाळेत हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ती शाळा या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात येईल. शिकत असलेल्या शाळेतच या मुलांसाठी विशेष तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्या यांची या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करावी लागेल. तथापि, संबंधित शाळेस विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.
- या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका टाईप करणे किंवा लिहिण्यासाठी तसेच पूर्ण पेपर किंवा पेपरचा काही भाग लिहिण्यासाठी लेखनिक घेण्यास परवानगी देण्यात येईल. जर हे विद्यार्थी स्वत: पेपर सोडवत असताना मध्येच थकले, पुढे पेपर सोडवू शकत नाही असे वाटले तर त्यांना शाळेतील प्रत्यक्ष अध्यापनाशी संबंध नसलेला कोणीही कर्मचारी लेखनिक म्हणून घेता येईल. हा कर्मचारी या विद्यार्थ्यांने बोललेली भाषा समजू शकत असावा. या लेखनिकांची काळजीपूर्वक निवड करावी हा लेखनिक बहुविकलांग विद्यार्थी काय सांगतो तेच समजून लिहू शकेल असा असावा.
- आकृत्या, नकाशे इ. काढण्यासाठी सवलत देय राहील. याचे गुण त्या विद्यार्थ्याला प्रमाणात देण्यात येतील.
- विज्ञान व तंत्रज्ञान पेपर १ व २ या विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी तोंडी परीक्षा देता येईल. तोंडी परीक्षेत प्रयोगांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.
- जे विद्यार्थी आरोग्य व शारीरिक शिक्षण, समाजसेवा/ बालवीर /वीरबाला/ छात्रसेना (N.C.C.) किंवा संरक्षण अभ्यास (Defence Studies) किंवा मुलकी संरक्षण व रस्ता सुरक्षा गस्त (Civil Defence and Road Safety Patrol) इत्यादी विषय पूर्ण करु शकत नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी या विषयात सवलत मिळविण्यासाठीचा अर्ज अपंगत्व (दिव्यांगत्व) /अस्थिरोग प्रमाणपत्रासह संबंधित शाळेमार्फत विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे पाठवावां.

- मुलांच्या गरजे प्रमाणे त्यांना अनुकूल असणारे फेरबदल प्रश्नपत्रिका तयार करण्यात यावेत.(फक्त इयत्ता १ ली ते ९ वी साठी).
- बहूविकलांग मुलांना अतिरिक्त सूचना किंवा संकेताची गरज भासते,तेव्हा परीक्षेच्या वेळी बैठकीची वेगळी व्यवस्था असावी.

**५) अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांसाठी सवलती :**

- विद्यार्थ्यांना त्यांच्या सोईनुसार जवळचे परीक्षा केंद्र देय राहील. (विद्यार्थी ज्या शाळेत शिक्षण घेत आहेत ती शाळा किंवा घराजवळची शाळा)
- परीक्षा पेपर सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ दिला जावा.
- अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना कमाल २० गुणांची सवलत एकाच विषयामध्ये किंवा सर्व विषयांमध्ये विभागून देण्यात यावी.
- विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे इ. काढण्याची सवलत देण्यात यावी. त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला प्रमाणात देण्यात यावेत.
- विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका टाईप करुन वा लिहून देण्याची परवानगी देण्यात यावी. त्यांना पूर्ण पेपर वा पेपरचा काही भाग लिहिण्यासाठी लेखनिक घेण्यास परवानगी देण्यात येईल जर हे विद्यार्थी स्वत: पेपर सोडवत असताना मध्येच थकले, पुढे पेपर सोडवू शकत नाही असे वाटले तर त्यांना शाळेतील प्रत्यक्ष अध्यापनाशी संबंध नसलेला कोणीही कर्मचारी लेखनिक म्हणून घेता येईल. हा कर्मचारी या विद्यार्थ्यांने बोललेली भाषा समजू शकत असावा. या लेखनिकांची काळजीपूर्वक निवड करावी हा लेखनिक बहुविकलांग विद्यार्थी काय सांगतो तेच समजून लिहू शकेल असा असावा.
- जे विद्यार्थी आरोग्य व शारीरिक शिक्षण,समाजसेवा किंवा बालवीर / वीरबाला किंवा छात्रसेना किंवा संरक्षण अभ्यास (Defence Studies) किंवा मूलकी संरक्षण व रस्ता सुरक्षा गस्त (Civil defence and Road safety Patrol) हे विषय पूर्ण करु शकत नाहीत. अशा विद्यार्थ्यांनी या विषयात सूट मिळेल. यासंबंधीचा अर्ज अस्थिरोग तज्ज्ञांच्या प्रमाणपत्रासह संबंधित शाळेमार्फत विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे पाठवावा.
- विज्ञान व तंत्रज्ञान पेपर १ व २ या विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी तोंडी परीक्षा देता येईल. तोंडी परीक्षेत प्रयोगांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.

**६) ऑटिस्टिक (स्वमग्न)विद्यार्थ्यांसाठी सवलती :**

- ज्या शाळेत हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तीच शाळा या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात येईल. त्यांच्या शाळेतच या मुलांसाठी विशेष तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, कॉम्प्युटर, खुर्च्या यांची या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करावी लागेल.
- परीक्षा पेपर सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ दिला जावा.
- अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना कमाल २० गुणांची सवलत एकाच विषयामध्ये किंवा सर्व विषयांमध्ये विभागून देण्यात यावी.
- विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका टाईप करुन वा लिहून देण्याची परवानगी देण्यात येईल. त्यांना पूर्ण पेपर किंवा पेपरचा काही भाग लिहिण्यासाठी लेखनिक घेण्यास परवानगी देण्यात येईल. जर हे विद्यार्थी स्वत: पेपर सोडवत असताना मध्येच थकले, पुढे पेपर सोडवू शकत नाही असे वाटले तर त्यांना शाळेतील प्रत्यक्ष अध्यापनाशी संबंध नसलेला कोणीही कर्मचारी लेखनिक म्हणून घेता येईल. हा कर्मचारी या विद्यार्थ्याने बोललेली भाषा समजू शकत असावा. या लेखनिकांची काळजीपूर्वक निवड करावी. हा लेखनिक ऑटिस्टिक विद्यार्थी काय सांगतो तेच लिहू शकेल असा असावा.

- विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे इ. काढण्याची सवलत देण्यात येईल. त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला प्रमाणात देण्यात येतील.
- विज्ञान व तंत्रज्ञान पेपर १ व २ या विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी तोंडी परीक्षा देता येईल. तोंडी परीक्षेत प्रयोगांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.
- जे विद्यार्थी आरोग्य व शारीरिक शिक्षण / समाजसेवा किंवा बालवीर / वीरबाला किंवा छात्रसेना किंवा संरक्षण अभ्यास (Defence Studies) मूलकी संरक्षण व रस्ता सुरक्षा गस्त (Civil defence and Road safety Patrol) हे विषय पूर्ण करु शकत नाहीत. अशा विद्यार्थ्यांनी या विषयात सूट मिळण्यासाठीचा यासंबंधीचा अर्ज मानसोपचार तज्ज्ञांच्या प्रमाणपत्रासह संबंधित शाळेमार्फत विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे पाठवावा.
- यामुलांसाठीस्पेलींग,व्याकरण,विरामचिन्हेयाबाबतीतगुणदानकमीकरण्यात येवू नये.
- गणितीय शब्द रचना सरळ व सोपी असावी.
- मौखिक मुल्यमापनासाठी  लेखीचा पर्याय असावा.
- परीक्षेसाठी सर्व मौखिक मार्गदर्शक सूचनाफलकांवर लिहून देण्यात याव्यात.

**७) सेरेबल पाल्सी मुलांसाठी मूल्यमापन  पध्दती**

- विद्यार्थ्यांना त्यांच्या सोईनुसार जवळचे परीक्षा केंद्र देय राहील. (विद्यार्थी ज्या शाळेत शिक्षण घेत आहेत ती शाळा किंवा घराजवळची शाळा)
- परीक्षा पेपर सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ दिला जावा.
- अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना कमाल २० गुणांची सवलत एकाच विषयामध्ये किंवा सर्व विषयांमध्ये विभागून देण्यात यावी.
- विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे इ. काढण्याची सवलत देण्यात येईल. त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला प्रमाणात देण्यात येतील.
- तांत्रिक पध्दतीचा वापर करण्यात यावा.(उदा.संगणक व संगणक प्रणालीVoice Synthesizer)
- प्रश्नाची प्रक्रिया  जाणून  घेण्यासाठी संप्रेक्षण (Communication Board) चा वापर करावा.
- कारक कौशल्यामध्ये दोष असलेल्या मुलांसाठी वापरण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिकेत/ अनूकूलीत फेरबदल करण्यात यावा.(फक्त इयत्ता १ ली ते ९ वी साठी).
- शरीराची योग्यस्थिती आणि बसण्याच्या व्यवस्थेसाठी अनुकूल नशील खुर्ची/टेबलची व्यवस्था करण्यात यावा.
- अनुकूलनशिल साहित्य आणि उपकरणांचा वापर करु देण्यात येईल.उदा.पेन्सिल व ग्रीप्स.
- सेरेब्रल पाल्सी विद्यार्थी जास्त दाब देऊन लिहितात त्यासाठी कागद /उत्तरपत्रिका जाड पानांची देण्यात यावा.

**८) मतीमंद मुलांसाठी मूल्यमापन पध्दती**

- विद्यार्थ्यांना त्यांच्या सोईनुसार जवळचे परीक्षाकेंद्र देय राहील. (विद्यार्थी ज्याशाळेत शिक्षण घेत आहेत ती शाळा किंवा घराजवळची शाळा)
- परीक्षा पेपर सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ दिला जावा.
- अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना कमाल २० गुणांची सवलत एकाच विषयामध्ये किंवा सर्व विषयांमध्ये विभागून देण्यात यावी.

- विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे इ. काढण्याची सवलत देण्यात येईल. त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला प्रमाणात देण्यात येतील.
- विज्ञान व तंत्रज्ञान पेपर १ व २ या विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी तोंडी परीक्षा देता येईल. तोंडीपरीक्षेत प्रयोगांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.
- प्रश्नपत्रिकांमधील भाषा सरळ सोपी ठेवण्यात यावी. (इ.१ ली ते ९ वी साठी)
- मुलांना ज्यावेळी थकवा जाणवत असेल अशा वेळी विश्रांती देण्यात यावी. ही वेळ सवलतीच्या वेळेपेक्षा जास्त नसावी.
- मुल्यमापन प्रक्रियेसाठी योग्य अध्ययन अध्यापन साहित्य वापरण्याची लवचिकता देण्यात यावी.
- पूर्णविराम,स्पेलिंग,व्याकरण इत्यादी बाबतच्या दोषासाठी गुणदानामध्ये कपात करण्यात येणार नाही.
- थॅलेसेमिया, कर्करोग, डायबिटिस इ. व वर प्रासंगिक उद्भवणाऱ्या आजारांसाठी विद्यार्थ्यांना सोयी देण्यात याव्या. या सवलती संबंधित पालकांशी चर्चा करुन शाळेच्या व (इ. १०/१२ वी) इयत्तांसाठी माध्यमिक मंडळाच्या मान्यतेने देण्यात याव्यात.

**विशेष नोंद:- (वर नमूद केलेल्या सर्व प्रकारच्या विशेष गरजा (दिव्यांग) असलेल्या विद्यार्थ्यांसाठी)**

१. **इयत्ता १ ली ते ९ वीच्या विद्यार्थ्यांना शालेय पातळीवर सुविधा दयाव्यात या सुविधा देताना संबंधित पालक व शिक्षक यांच्याशी चर्चा करुन विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार मुख्याध्यापकांनी सवलती देण्याचा निर्णय घ्यावा. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस पुरक ठरणाऱ्या सवलती देणे बंधनकारक राहील.**

२. लेखनिक : **इयत्ता १ ली ते ९ वी पर्यत आवश्यकतेनुसार लेखनिक घेण्यास मुभा द्यावी. इयत्ता १ ली ते ९ वी पर्यत लेखनिक हा मागील इयत्तेचा असावा.**

**इयत्ता १० वी ते १२ वी पर्यत विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना गरजेनुसार प्रौढ लेखनिक घेण्याचे स्वातंत्र्य असावे. प्रौढ लेखनिक विदयार्थ्यांचा पालक अथवा नातेवाईक नसावा.** संबंधित शाळेने खातरजमा करुन प्रौढ लेखनिकास मान्यता द्यावी.

- कला, वाणिज्य, विज्ञान शाखेपैकी कोणत्याही शाखेत घेणाऱ्या कर्णबधिर, बहुविकलांग, ऑटिस्टिक अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांना दोन भाषा व चार ऐच्छिक विषय अशा सहा विषयांऐवजी एक भाषा व पाच ऐच्छिक विषय घेण्याची परवानगी देण्यात येईल.
- व्यावसायिक, अभ्यासक्रम निवडणाऱ्या कर्णबधिर, अंशत: अंध / पूर्णत: अंध, अस्थिव्यंग, स्पॅस्टिक / बहुविकलांग, ऑटिस्टिक, अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या मान्यताप्राप्त व्यवसाय प्रशिक्षण संस्थेच्या प्रमुखांचे, यशस्वीरित्या अभ्यासक्रम पूर्ण करण्याबाबतचे प्रमाणपत्र उच्च माध्यमिक परीक्षेसाठी ग्राहय धरले जाईल.
- इ.१२ वी परीक्षेत पविष्ठ होणाऱ्या अध्ययन अक्षम व ऑटिस्टिक (स्वमग्न) विद्यार्थ्यांना गणित सर्वशाखा,पुस्तकपालन लेखाकर्म,भौतिकशास्त्र,रसायनशास्त्र या विषयासाठी कॅलक्यूलेटर (Calculater) वापरण्याची इच्छा असेल तर कॅलक्यूलेटर वापरता येईल.
- राज्य मंडळाने निश्चित केलेली खालील प्रमाणे विषय योजना इ.९ वी ते इ.१० वी तील सर्व विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

विषययोजना :

१. प्रथम भाषा-१०० गुण
२. द्वितीय भाषा- १०० गुण
३. तृतीय भाषा-१० गुण

किंवा

एक भाषा विषय अनिवार्य व कार्यशिक्षण विषयांपैकी कोणतेही दोन विषय

४. गणित किंवा सामान्य गणित

किंवा

इ.७ वीचे अंकगणित व त्यासोबत कार्यशिक्षण विषयांपैकी कोणताही एक विषय

५. विज्ञान व तंत्रज्ञान विषय

किंवा

शरीर शास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषय

६. इतिहास- राज्यशास्त्र व भूगोल- अर्थशास्त्र

- संबंधित शाळाप्रमुख व परीक्षा मंडळ यांनी या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या सर्व सवलती व सुविधा या विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळतील याची खातरजमा करावी. हे आदेश राज्यातील सर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांना लागू राहतील. तसेच उपरोक्त आदेश सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांना लागू राहील. सदर आदेश सर्व शाळांच्या मुख्ध्याध्यापकांच्या निदर्शनास आणणे ही क्षेत्रिय अधिकाऱ्यांची जबाबदारी राहील.

उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या सर्व सोयी सुविधा मार्च २०१६ मध्ये होणाऱ्या इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षांमध्ये प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता व एप्रिल मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या दुसऱ्या सत्रांत चाचणी मध्ये व इयत्ता ९ वी व इयत्ता ११ वी करिता घेण्यात येणाऱ्या वार्षिक परीक्षांपासून लागू करण्यात याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०८१७४१४२९५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Nandkumar

Digitally signed by Nandkumar
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=110001, st=Maharashtra, serialNumber=dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6cfb37c2bb83da1977886645dd8a362ebc5, cn=Nandkumar
Date: 2016.01.08 17:48:37 +05'30'

(नंदकुमार)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव
४) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
५) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
६) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

८) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई.
९) अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१२) अध्यक्ष/सचिव, आय.सी.एस.इ., नवी दिल्ली.
१३) अध्यक्ष/सचिव, केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळ.
१४) सर्व विभागीय अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
१५) सर्व विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
१६) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१७) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद सर्व.
१८) शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई.
१९) प्रशासन अधिकारी, महानगरपालिका सर्व.
२०) निवड नस्ती, एसडी-६

८)

विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग)
विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी लेखनिक
देणेबाबत सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण २०१५/११९-अ/एसडी-६**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
तारीख: १५ फेब्रुवारी, २०१६.

**वाचा -**

शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण २०१५/(११९-अ)/एसडी-६, दिनांक ८/०१/२०१६

**प्रस्तावना -**

विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना शैक्षणिक मुल्यमापनामध्ये गरजेनुसार सोयी-सवलती देण्यासंदर्भात शासन स्तरावरुन समिती गठित करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीनुसार इयत्ता १ ली ते इयत्ता १२ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सोयी-सवलती देण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना परिक्षा देताना अडचणी उद्भवू नये या अनुषंगाने लेखनिक देण्यासंदर्भात संबंधित पात्र विद्यार्थ्यांनी मागणी केल्यास लेखनिक पुरविण्यासंदर्भात खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक -**

**१) खालील नमूद विशेष गरजा (दिव्यांग) असणाऱ्या विद्यार्थ्यांना लेखनिक घेता येईल.**

अ) अंशत: अंध / पूर्णत: अंध
ब) अस्थिव्यंग (लेखन करणेचे हाताने अक्षम)
क) बहुविकलांग
ड) अध्ययन अक्षम
इ) स्वमग्न
ई) सेरेबल पाल्सी
फ) मतिमंद

**२) लेखनिक घेण्याबाबतचे निकष:-**

१. लेखनिक निवडताना प्राधान्याने परीक्षा द्यावयाच्या वर्गाच्या एक इयत्ता खालच्या वर्गाचा विद्यार्थी निवडण्यात यावा.

२. उपरोक्त १ येथे नमूद प्रमाणे लेखनिक उपलब्ध होत नसल्यास प्रौढ (Adult) लेखनिक घेता येईल.

३. प्रौढ (Adult) लेखनिक हे शाळेतील अथवा अन्य शाळेतील शिक्षक, खाजगी शिकवणी वर्गातील शिक्षक / प्रतिनिधी, विद्यार्थ्यांचे जवळचे नातेवाईक नसावेत. तथापि, विशेष बाब म्हणून जवळच्या नातेवाईकांना लेखनिक म्हणून परवानगी देण्याचे अधिकार (प्रकरणांची शहानिशा करुन) संबंधित अध्यक्ष विभागीय मंडळ यांना राहील.

४. दिव्यांग विद्यार्थ्यांना " मागील इयत्तेचा विद्यार्थी अथवा प्रौढ", लेखनिक म्हणून नेमून देण्याचे अधिकार संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना राहतील. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या असलेल्या अडचणी व गरज याबद्दलची जाणीव संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना असल्याने हे अधिकार त्यांना राहतील.

३. **दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखनिक देण्याकरीता शिफारस देण्याची जबाबदारी व त्याची पध्दत:-**

अ) शाळेतील मुख्याध्यापक / कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य सदर विद्यार्थ्यांसाठी लेखनिक देण्याबाबत स्पष्ट अभिप्राय /शिफारशीसह संबंधित विभागीय शिक्षण मंडळाकडे शिफारस करतील. विभागीय मंडळ प्रस्तावांच्या मान्यतेबाबत तात्काळ संबंधित शाळा /कनिष्ठ महाविद्यालय यांना लेखी कळवतील.

ब) ज्या विद्यार्थ्यांस लेखनिक दिले जातील त्या लेखनिकाचा तपशील शाळेचे मुख्याध्यापक / कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संबंधित (प्रौढ लेखनिकाचे शासन मान्य ओळखपत्राची प्रत व पालकांचा अर्ज या तपशिलासह) विभागीय शिक्षण मंडळाकडे सादर करतील.

क) अपवादात्मक परिस्थितीमध्ये ऐनवेळी लेखनिक देण्याबाबतचा निर्णय संबंधित सेंटरप्रमुखास घ्यावा लागल्यास, त्यांना त्याबाबतचा अधिकार राहील व त्यांनी संपूर्ण वस्तुस्थितीसह विभागीय परीक्षा मंडळाची याकरीता कार्योत्तर मान्यता घ्यावी. तसेच विभागीय मंडळाने याकरीता योग्य ते सहकार्य करावे.

४) **राज्य मंडळातर्फे हेल्पलाईन :-** राज्य मंडळातर्फे इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनास्तव Help line सुरु करण्यात येते. त्या Help line वर या संदर्भात कोणतेही प्रश्न असल्यास संपर्क करता येवू शकेल.

५) शासन निर्णय दिनांक ०८ जानेवारी, २०१६ कर्णबधिर विद्यार्थ्यांकरीता परीक्षा पेपर सोडविण्यासाठी प्रतितास ३० मिनिटे अधिक वेळ दिला जावा असे नमूद केले आहे. तथापि, ही सवलत प्रतितास २० मिनिटे इतक्या कालावधीसाठी राहील.

६) शासन निर्णय दिनांक ०८ जानेवारी, २०१६ मध्ये गणकयंत्राची सुविधा अंध विद्यार्थ्यांना देण्यात आलेली आहे. ही सवलत बहुविकलांग, ऑटीस्टीक, सेरेबल पाल्सी, मतिमंद या विशेष गरजा असणा-या इयत्ता १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना देखील गणकयंत्राची सुविधा लागू राहील.

७) शासन निर्णय दिनांक ०८ जानेवारी, २०१६ मध्ये पृ ७/प. येथे नमूद केल्याप्रमाणे विषय योजनेतील तृतीय भाषेमध्ये १० ऐवजी १०० गुण राहतील.

हे आदेश या शैक्षणिक २०१५-१६ वर्षापासून लागू रहातील.

हे शासन परिपत्रक सर्व शाळांचे मुख्याध्यापक व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्यापर्यंत तसेच सर्व पालकांपर्यंत पोहचेल, याकरिता आवश्यक सूचना क्षेत्रिय स्तरावरुन निर्गमित करण्यात याव्यात व मंडळाने आपल्या संकेतस्थळावरही प्रदर्शित करावयात.

संबंधित शाळाप्रमुख व परीक्षा मंडळ यांनी या शासन परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या वरील प्रमाणे नमूद दिव्यांग विद्यार्थ्यांना मागणी नुसार लेखनिक देणेबाबत कार्यवाही करावी. कोणताही सवलत पात्र विद्यार्थी या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२१५१७२९३९२१२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ.सुवर्णा खरात)
उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मुंबई
३) अप्पर मुख्य सचिव, वैद्यकिय शिक्षण व द्रव्ये विभाग, मुंबई.
४) मा. मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव, मुंबई.
५) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव.
६) मा. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहाय्यक.
७) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१०) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई
११) अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१४) अध्यक्ष / सचिव, आय.सी.एस.ई, नवी दिल्ली.
१५) अध्यक्ष / सचिव, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ.
१६) सर्व विभागीय अध्यक्ष / सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
१७) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१८) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद सर्व.

१९)शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई.
२०)प्रशासन अधिकारी, महानगरपालिका सर्व.
२१)उपसंचालक, आरोग्य सेवा, सर्व विभाग.
२२)अधिष्ठाता, जे.जे.हॉस्पिटल, मुंबई.
२३)अधिष्ठाता, के.इ.म.हॉस्पिटल, मुंबई.
२४)अधिष्ठाता, नायर हॉस्पिटल, मुंबई.
२५)अधिष्ठाता, सायन हॉस्पिटल, मुंबई.
२६)अधिष्ठाता, कूपर हॉस्पिटल, मुंबई.
२७)अधिष्ठाता, राजावाडी हॉस्पिटल, मुंबई.
२८)वैद्यकिय अधिक्षक, भगवती हॉस्पिटल, मुंबई.
२९)जिल्हा शल्यचिकित्सक, सर्व जिल्हे.
३०)जिल्हा वैद्यकिय अधिकारी, सर्व जिल्हे.
३१)निवड नस्ती एसडी-६.